MHAH220004442013

नियमित दिवाणी दावा क्र. ५३/२०१३
शिवाजी व इतर वि. विश्वनाथ व इतर

आदेश
(नि.क्र.७८ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दुरुस्तीकामी दाखल केला आहे.

२. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा दावा मिळकतीची उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कर्जत यांच्यामार्फत मोजणी होऊन मिळणेबाबत व मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे. वाद मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचे मालकीप्रमाणे वहिवाट आहे. सदरचे वाद मिळकतीचे कायमचे निराकरण करेणेसाठी दावा मिळकत स.नं. १८०/२ब/१ पैकी वादीचा भाऊ काशिनाथ एकनाथ कोल्हे याने दि. २१.०२.२००९ रोजी प्रतिवादी क्र. १ यास खरेदीखत करुन दिल्यानंतर वादीने कोर्टात रे.मु.नं. ७९/२०१० चा दावा दाखल केला होता त्यामध्ये तडजोड झाली आहे. तरीही प्रतिवादी हे वादीस हरकत अडथळा करीत असल्याने वादीने उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कर्जत यांचे मार्फत मो.र.नं. ९५५/२०११ नुसार मोजणी करुन घेतली. तसेच त्यानंतरही दि. ०५.०३.२०१२ रोजी मोजणी फी भरुन मो.र.नं. १०११/२०१२ नुसार मोजणी करता आली नाही तसेच हद्दीखुणा दाखवण्यात आल्या नाहीत. त्यामुळे वादीने दि. ३१.१२.२०१२ रोजी उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांचे कार्यालयात मोजणी नकाशाची मागणी केली असता मोजणी नकाशा देण्यात आला नाही. तसेच मोजणीचे काम पुर्ण न झाल्यामुळे नकाशा व माहिती देता येत नाही. असे दि. २८.०१.२०१३ रोजी कळविल्याने वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. सदर दाव्यातील वादविषय, दाव्यास कारण व दाव्यातील विनंती ही उपअधिक्षक, भूमी अभिलेख कर्जत यांचेशी संबंधी निगडीत असून त्यांना या दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे वाटल्याने कोर्टाने तसा नि.१ ला आदेश केला आहे. त्यामुळे वादीने दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ नंतर ८- उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर अशी दुरुस्ती तसेच दावा परिच्छेद ८ मध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी म्हणणे देऊन सदर अर्जास आक्षेप नोंदवला व कथन केले की, सदर अर्ज कायदेशीर नाही. सदर दुरुस्ती ही पुर्णपणे चुकीची व बेकायदेशीर आहे. सदर दुरुस्ती केल्यास या न्यायालयाला दावा चालविण्याचा अधिकार राहणार नाही. वादीने सदरचा दावा मागे घेऊन नवीन दावा दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर यांचेकडे दाखल करणे आवश्यक आहे. दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

४. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले, संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने दाखल केलेल्या दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, वादीने परिच्छेद क्र. १३ मध्ये सर्व्हे क्र. १८० या जमिनीच्या पोटहिश्यासह ७/१२ उताऱ्याप्रमाणे उपअधिक्षक भूमीअभिलेख कर्जत यांच्यामार्फत मोजणी होऊन हद्दीखुणा करुन मिळाव्यात अशी विनंती केली आहे. वादीने दाव्याच्या वादकारणामध्ये दि. २८.०१.२०१३ रोजी उपअधिक्षक, भूमी अभिलेख कर्जत यांनी वादीस मोजणी नकाशाचे काम पुर्ण न झाल्याने मोजणी नकाशा पुरवता येणार नाही कळवले असे नमुद आहे. यावरुन असे दिसून येत आहे की, वादीने उपअधिक्षक, भूमी अभिलेख कर्जत यांनी मोजणी करुन हद्दीखुणा कराव्यात व त्याबाबतचा आदेश मिळावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादींनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये सर्व्हे क्र. १८० चा पोटहिस्सा होताना पोटहिस्सा फाळणी मोजणी झालेली नाही. त्यामुळे पुन्हा मोजणी करुन हद्दीखुणा दाखवता येणार नाहीत असे कथन केले आहे. तसेच माझे पुर्वअधिकारी दिवाणी न्यायाधीश यांनी नि.क्र. १ खाली दि. २९.०९.२०१९ रोजी आदेश पारीत करुन त्यामध्ये असे नमुद केले आहे की, वादीने उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांचेविरुध्द दिलासा मागितला असल्यामुळे व ते या दाव्यात पार्टी नसल्यामुळे त्यांना वादीने या दाव्यात पार्टी करावे. वरील सर्व बाबींचा विचार करता व वादीची मागणी ही उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कर्जत यांचेविरुध्द देखील असल्यामुळे त्यांना या दाव्यात पक्षकार म्हणून सामिल करुन घेणे उचीत होईल. कारण त्यांची या दाव्यात हजेरी व उपस्थिती आणि म्हणणे हे दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीच्या अर्जातील विनंतीप्रमाणे प्रतिवादी क्र. ८ म्हणून उपअधिक्षक,

भूमीअभिलेख कर्जत, ता. कर्जत यांना या दाव्यात पक्षकार म्हणुन सामिल करणेबाबत आदेश करणे गरजेचे आहे व त्यानुशंगाने वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती करण्याची परवानगी वादीला देणे आवश्यक वाटते म्हणून मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) अर्ज नि.क्र.७८ खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ८ म्हणुन उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कर्जत, ता. कर्जत यांना सामिल करण्याची परवानगी वादीला देण्यात येते. तसेच वादीने अर्जात नमुद केलेली उर्वरीत दुरुस्ती करण्याची परवानगीदेखील वादीला देण्यात येते.

३) वादीने वरील नमुद दुरुस्ती पुढील तारखेवर किंवा त्यापुर्वी करावी आणि दुरुस्त वादपत्र अभिलेखावर दाखल करावे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.07.17 16:59:43 +0530

(आर. बी. राऊत)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :१७/०७/२०२५.